# सुरश्री केसरबाई केरकर

**शंकर अभ्यंकर**

सुरश्री केसरबाई केरकर यांची पहिली मैफिल मी विलेपार्ल्याला ऐकली. सर्व घराण्यांच्या गायक-गायिका एकत्र पाहण्याचा माझा तो पहिलाच अनुभव होता. या गायिकेव्यतिरिक्त इतक्या घराण्यांचे लोक दुसऱ्या गायक-गायिकेला ऐकायला आलेले मी तरी पाहिले नव्हते. मी ऐकलेल्या कलावंतांमध्ये तीन वर्ग होते. पहिले दहशतवादी कलावंत, श्रोत्यांना ज्यांची दहशत वाटेल असे! या कलावंतांचे केव्हा काय बिघडेल याचा नेम नसे. यात एक नंबरचे दोन कलावंत. पुरुषांमध्ये पं. ओंकारनाथ आणि स्त्रियांमध्ये केसरबाई. मधल्या वर्गातले कलावंत कमी त्रासदायक व जे कलावंत यायच्या आधीच मैफिल प्रसन्न होत असे ते कलावंत म्हणजे मास्तर कृष्णराव व माणिक वर्मा अशी वर्गवारी मी वहीत लिहून ठेवली होती.

हॉल खचाखच भरलेला. केसरबाई खाली आल्याचे कळताच हॉलमधील गोंगाट एकदम बंद झाला. त्या वेळी केसरबाईंचे साथीदार मजीदखाँ व यशवंत केरकर होते. त्या गायला बसल्या. आल्याबरोबर निवेदकाला बोलावून त्यांनी पर्समधून एक चिठ्ठी काढली व त्यातील नावे माईकवरून वाचायला सांगितली.

निवेदक : वाचून काय सांगू ?

केसरबाई : हे लोक आले असतील तर त्यांना हाकलून लावा, असं केसरबाईंनी सांगितलंय म्हणून सांगा.

मला आश्चर्य वाटले. कारण त्या यादीमध्ये नावाजलेले लोकही होते. नंतर माझ्या लक्षात आले की, त्यांच्या प्रत्येक मैफिलीची सुरुवात अशीच होत असे. पुढे पुढे हा हाकलण्याचा कार्यक्रम कमी झाला.

पार्ल्याच्या पहिल्याच मैफिलीची सुरुवात मारूबिहागने झाली. आटवलेल्या दुधासारखा आकारात लावलेला षडज् व त्यानंतर दोन-तीन आलाप घेऊन 'रसिया हो ना' हा ख्याल त्यांनी अशा काही वजनाने म्हटला की, स्थाई संपवून बाई जेव्हा समेवर आल्यावर तेव्हा सर्वांनी एकच वाहवा केली. 'प्रचंड दमसास' हे केसरबाईंचे वैशिष्ट्य. त्यामुळे इतरांना स्थाई म्हणताना जितके श्वास घ्यावे लागतात त्याच्या एकचतुर्थांश श्वासात त्या स्थाई भरत. त्यांनी ख्यालातील आवर्तनाची ओळख कितीही वेळा म्हटली तरी ती तशीच्या तशी येत असे. त्याच्यात पाव मात्रेचासुद्धा बदल होत नसे. द्रूत चिजा त्या म्हणत नसत. पहिला ख्याल झाला की, दुसऱ्या रागातला ख्याल त्याच लयीत असे. मध्यंतरानंतर बहुधा तोच क्रम असे. त्यांचे पेटंट राग म्हणजे बिहागडा, खोकर, नटकामोद, कानड्याचे प्रकार- नायकी कानडा, काफी कानडा, रायसा कानडा- असे असत. चार तासांच्या बैठकीत सुगम संगीत बहुतेक नसेच. तरीसुद्धा नुसत्या ख्याल गायनाने बैठक ताब्यात ठेवण्याचे

त्यांचे कसब और म्हणावे लागेल. सर्व घराण्यांच्या लोकांना हे रागांचे प्रकार नवीन होते. केसरबाई या सर्व घराण्यांच्या गायक-गायिकांमध्ये विद्वान गायिका समजल्या जात. रागाशी व ख्याल गायनाशी कुठेही तडजोड केलेली त्यांना खपत नसे. अचाट मेहनतीने आवाजात आलेले तेज शेवटपर्यंत कायम असे.

त्यानंतर दोनच दिवसांनी मी माझे गुरुजी पं. नारायणराव व्यास यांच्याबरोबर दादर मार्केटमध्ये भाजी खरेदी करण्यासाठी गेलो होतो. त्या दिवशी नेहमीप्रमाणे आम्ही भाजी घेत असताना पाहतो तो केसरबाई त्याच भैयाकडे भाजी घेत होत्या. ज्या बाईंचे गाणे आपण परवा ऐकले आणि ज्यांचा मोठेपणा, दबदबा क्षणाक्षणाला जाणवला होता, त्या केसरबाई स्वतः भाजी घेताहेत हे पाहून आश्चर्य वाटले. केसरबाईंची व नारायणरावांची नजरानजर झाल्यावर त्या म्हणाल्या, ''नारायण, तू स्वतः भाजी घ्यायला येतोस ते चांगलं करतोस. आपल्या पसंतीच्या भाज्या आपण आल्याशिवाय मिळत नाहीत.'' नारायणरावांचे व केसरबाईंचे गाण्यात जमले नसेल, पण खाण्यात जमले हे पाहून गंमत वाटली. बाईंनी माझ्याकडे पाहिले. मी त्यांना म्हटले, ''परवा तुमचं गाणं फार छान झालं.'' त्या म्हणाल्या, ''माझं गाणं समजायला अजून तू लहान आहेस'', असे म्हणून त्यांनी माझा कान पिरगळला व म्हणाल्या, ''गाणं शिकतोस ना, खूप मेहनत कर.'' मी केसरबाईंच्या स्पर्शाने व बोलण्याने जागेवरून नाहीसा झालो होतो. पुढे दोन-तीन दिवस ही गोष्ट किती जणांना सांगितली तरी समाधान होत नव्हते.

पुढे केसरबाईंच्या अनेक मैफिली ऐकल्या. त्या सर्व त्यांच्या विद्येला साजेशा होत्या. अशाच एका मैफिलीला मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण आले होते. या पूर्वीही यशवंतरावांना मी त्यांच्या तीन-चार मैफिलीत पाहिले होते. हा कार्यक्रम 'बिर्ला'मध्ये झाला होता. मला केसरबाईंइतकेच यशवंतरावांबद्दलही आकर्षण होते. कार्यक्रम संपल्यावर स्टेजवर जाऊन यशवंतराव बाईंशी बोलत होते. मी तिथेच होतो. यशवंतरावांनी बाईंना मुख्यमंत्र्यांच्या ऑफिसमध्ये येण्याचे आमंत्रण दिले. बाईंनीच तशी इच्छा प्रदर्शित केली होती. त्यानंतर यशवंतरावांच्या केबिनमध्ये बाई येणार म्हणून संपूर्ण सचिवालयात बातमी पसरली होती. बाई आल्यावर यशवंतरावांनी त्यांचे स्वागत करून त्यांना खुर्चीवर बसवले व त्यांचा व्यवस्थित पाहुणचार केला.

एकदा माहीममध्ये एकाच्या घरी, घरच्या हॉलमध्ये आग्रा घराण्याचे प्रसिद्ध गायक उस्ताद विलायत हुसेन खाँ यांचा कार्यक्रम होता. आग्रा घराण्याचे सगळे गायक- गायिका जमले होते. सुरश्री केसरबाईंना गाणे ऐकायला बोलावले होते. त्यामुळे सुद्धा गर्दी वाढली होती. खाँसाहेब गायला बसले. त्यांनी पहिला राग सुरू करून अर्धा तास झाल्यावर केसरबाई आल्या. खाँसाहेबांचे गाणे सर्वजण श्रद्धेने ऐकत असताना मध्येच त्या आल्या. सर्वांना ते जरा खटकलेच. परंतु केसरबाईंना पाहताच खाँसाहेबांनी गाणे थांबवून, बाईपाशी जाऊन, वाकून त्यांना नमस्कार केला. हा प्रकार सर्वांना फार खटकला, परंतु यावरून बाईंचा दबदबा किती होता, ते लक्षात येते.

केसरबाईंचे काही निर्णय इतके कठोर होते की ते ऐकल्यावर कोणीही चकीत होईल. त्यांना उद्घाटनाला बोलावले तर ''तिथे मी एक शब्दही बोलणार नाही,'' असे त्या सांगत. एकदा क्लब हाऊस येथे संगीत विभागाचे उद्घाटन करण्यासाठी पु. ल. देशपांडे त्यांना आमंत्रण देण्यासाठी गेले. तेव्हा त्या म्हणाल्या, ''मी येईन, पण अजिबात बोलणार नाही,'' मग असे ठरले की, सुरात जुळवलेला तंबोरा केसरबाईंनी वाजवायचा आणि उद्घाटन झाल्याचे जाहीर करायचे.

आरंभीच्या काळात मागणी असूनही त्यांच्या फारशा ध्वनिमुद्रिका निघाल्या नाहीत, याचे कारणही त्यांचा काहीसा कठोर निर्णय हेच होते.

एच.एम.व्ही.चे त्या काळचे रेकॉर्डिंगचे मुख्य रमाकांत रूपजी हे नारायणराव व्यासांकडे आले असता सांगत होते की, ''या केसरबाई रेकॉर्डिंगला नेहमी नकार देतात. म्हणून आज त्यांच्या घरी जाऊन त्यांच्या पुढे चेकबुक टाकले व म्हणालो, 'बाई, हवी तेवढी रक्कम टाका, पण तुमच्या रेकॉर्ड्स आल्या पाहिजेत.'' यावर केसरबाई म्हणाल्या, ''रमाकांत, मी पैशांकरिता रेकॉर्डिंग करीत

नाही, असा तुमचा समज झालेला दिसतोय. माझे गाणे मानाने समोर बसून श्रोत्यांनी ऐकावे, अशी माझी इच्छा असते. रेकॉर्ड्स निघाल्या की लोक बाथरूममध्ये आंघोळ करताना किंवा रात्री अंथरुणात पडून माझे गाणे ऐकतील आणि ते मला नकोय.'' मात्र यानंतर पुढील पिढ्यांनाही त्यांचे गाणे ऐकायला मिळण्यासाठी रेकॉर्डिंगची आवश्यकता आहे, हे पटल्यामुळे त्यांनी काही ध्वनिमुद्रिका दिल्या.

त्या आठवड्यातून एकच कार्यक्रम स्वीकारीत. खूप कार्यक्रम घेत नसत. शनिवारी किंवा रविवारी कार्यक्रम असेल तर त्या अगोदर आठवडाभर साथीदारांसहित संपूर्ण कार्यक्रमाचा रियाज करीत व नंतरच सभागृहात कार्यक्रम सादर करीत. यात त्यांनी शेवटपर्यंत कधीही टाळाटाळ केली नाही.

१९४९ सालापासून मी केसरबाईंचे अनेक कार्यक्रम ऐकले. १९६६ साली त्यांचा शेवटचा मोठा कार्यक्रम ऐकला. पेडर रोड येथे आपटे यांचा प्रासादतुल्य बंगला होता. आपट्यांच्या मुलीवर केसरबाईंचा फार जीव. क्रिकेटपटू माधव आपटे यांची ही बहीण. तो बंगला पाडून त्या जागी अनेक मजली 'वुडलँड अपार्टमेंट' होणार होते, ती जुनी वास्तू दोन-चार दिवसांत जमीनदोस्त होणार होती. ती वास्तू जुनी असूनही अजून सतेज होती आणि वृद्धत्वातसुद्धा सुरांचे तेज तसेच ठेवणाऱ्या केसरबाईंच्या गायनाने त्या बंगल्याची उत्तरपूजा व्हावी, हे उचितच होते.

मी त्या कार्यक्रमाला लवकर गेलो होतो. वेगवेगळ्या क्षेत्रांतील खूप बडी बडी मंडळी व नामवंत गायक- गायिका गाणे ऐकायला आल्या होत्या. मंडळी हॉलमध्ये, जिन्यात, खालच्या अंगणात गर्दी करून बसली होती. समोर माइक दिसताच रेकॉर्डिंगची शंका येऊन केसरबाईंनी तो उचलायला सांगितला व म्हणाल्या, ''माझे गाणे खालपर्यंत सर्वांना ऐकू जाईल.'' केसरबाईंचा हुकूम; तो पाळलाच पाहिजे! कितीही पैसे दिले तरी बाईंच्या अटी मान्य करण्याखेरीज गत्यंतर नसे, सर्वजण त्यांचे कसे ऐकत, हे एक कोडेच होते.

गाणे रात्री १ ला संपले, चार-साडेचार तास चाललेल्या मैफलीतल्या तेजस्वी स्वरांनी सगळ्यांना खिळवून ठेवले होते. बाईंचे वय यावेळी ७४ होते. गेली सतरा-अठरा वर्षे बाईंच्या दमसासात कसलाही फरक झाला नव्हता, परंतु हा कार्यक्रम झाल्यावर बाईंच्या बोलण्यात 'आता माझ्या गाण्यात वार्धक्य येऊ लागलंय' अशी भावना उमटली. त्यांना दोन-तीन ठिकाणी स्वर हलल्याची जाणीव झाली होती व तिथेच त्यांचा निर्णय झाला होता की आता गाणे बंद! यापूर्वी अगोदरच ठरला होता म्हणून आणखी एखादाच कार्यक्रम झाला असेल! त्यांनी ठरवल्याप्रमाणे कोणत्या तरी विद्यार्थिनीला त्यांचा तंबोरा घेऊन जायला सांगितले व त्या दिवसापासून घरातसुद्धा 'सा' लावला नाही. माझ्या आयुष्यात अनेक गायक 'साठीनंतर गाणार नाही अशी घोषणा करून पुढे पंधरा वर्षे गात राहिले व अखेर लोकाग्रहास्तव त्यांना गाणे बंद करावे लागले, हे मी पाहिले आहे. या पार्श्वभूमीवर केसरबाईंचा हा निर्णय खरोखर इतिहासात लिहून ठेवण्यासारखा आहे. पुढे १० वर्षे त्यांनी घरातसुद्धा 'सा' लावला नाही. त्यांची ही विद्या त्यांच्या एकमेव शिष्या धोंडूताई कुलकर्णी यांनी जतन करून ठेवली आहे. अखेर १६ सप्टेंबर १९७७ रोजी या घोटीव स्वराच्या तपस्विनीचा अंत झाला.

**पं. शंकर अभ्यंकर**

**(पूर्वप्रसिद्धी : लोकसत्ता, ८ जुलै २००७)**